MHAH150009122013

| | |
|---|---|
| केस दाखल दिनांक | १५/०४/२०१३ |
| केस नोंदणी दिनांक | १५/०४/२०१३ |
| केस निकाल दिनांक | २३/०२/२०२३ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | ०९ १० ०८ |

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. २, नेवासा यांचे न्यायालयात**

**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए.एस.गुंजवटे )**

**नियमित फौजदारी खटला क्र.१०३/२०१३**

**निशाणी –४९**

**महाराष्ट्र शासन**
मार्फत सोनई पोलीस स्टेशन
ता.नेवासा, जि.अहमदनगर ... **अभियोग पक्ष**

**विरुध्द**

१. **किशोर विष्णु टिमकरे,**
वय – २२ वर्षे, धंदा –मजुरी,
रा. इमामपुर, ता. नगर, जि.अहमदनगर.

२. **दिलीप शिवाजी दुसुंगे,**
वय – २८ वर्षे, धंदा– मजुरी,
रा. कापुरवाडी, ता. जि. अहमदनगर. ... **आरोपी**

**गुन्हा–** भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३७९ सह कलम ३४, गौण खनिज कायदा कलम ३ सह कलम १५ तसेच मोटार वाहन कायदा कलम ३(१)/१८१ व १३०/१७७ प्रमाणे.

---

अभियोग पक्षातर्फे विधीज्ञ – सहा.सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे.
आरोपीतर्फे विधीज्ञ – ॲड. श्री. के.एस.ढेरे.

---

## न्यायनिर्णय

## (आज दिनांक २३/०२/२०२३ रोजी खुल्या न्यायालयात घोषित)

प्रस्तुतचा खटला आरोपी क्र.२ यांच्या विरुध्द भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३७९ सह कलम ३४, गौण खनिज कायदा कलम ३ सह कलम १५ तसेच मोटार वाहन कायदा कलम ३(१)/१८१ व १३०/१७७ गुन्हासाठी चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

२) दिनांक २६/११/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास, मौजे खरवंडी गावात खरवंडी ते तामसवाडी रोडवर नदीचे पुलाजवळ, आरोपी क्र.१ याने आरोपी क्र.२ याचे सांगणेवरुन त्याचे ताब्यातील डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ यामध्ये विनापरपवाना बेकायदा रक्कम रुपये ७५००/– किंमतीची अडीच ब्रास वाळु भरुन चोरटी वाहतुक करताना मिळुन आले. तसेच चालकाने लायसन व वाहनाची कागदपत्र जवळ बाळगले नाहीत. आरोपींनी मुळा नदीचे पात्रातून पर्यावरणास इजा पोहोचेल असे कृत्य केले. अशा रितीने आरोपी क्र.१ व २ यांनी डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ मध्ये अडीच ब्रास वाळु शासनाच्या परवानगीशिवाय चोरुन वाळु वाहतुक केली. म्हणुन प्रस्तुतची फिर्याद फिर्यादीने दाखल केली.

३) या फिर्यादीवरून सोनई पोलीस स्टेशन, ता. नेवासा, जि. अहमदनगर येथे गु.र.क्र.।–१७४/२०१२ नोंदवण्यात येवुन त्याचा पुढील तपास पो.हे.कॉ. एन.डी.वेताळ यांनी केला. तपासादरम्यान त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, जप्ती पंचनामा व घटनास्थळ पंचनामा केला. सदर प्रकरणात गुन्हा घडल्याचे निष्पन्न होत असल्यामुळे त्यांनी आरोपींविरुध्द

दोषारोपपत्र न्यायालयात हजर केले.

४) माझ्या पुर्वीच्या पिठासिन अधिकारी यांनी आरोपी क्र.२ यांच्या विरुध्द नि.२७ लगत दोषारोप निश्चित केले. सदरचे दोषारोप आरोपी क्र.२ यांना मराठी भाषेत वाचुन दाखवुन समजावुन सांगीतला असता आरोपी क्र.२ ने त्याच्याविरुध्दचे दोषारोप नाकारले व त्याच्याविरुध्द खटला चालविण्याची विनंती केली.

५) आरोपी क्र.२ यांच्याविरुध्द दोषारोप सिध्द करण्याकरीता अभियोग तीन साक्षीदार तपासले आहे. आरोपीविरुध्द सदर गुन्हयाच्या अनुषंगाने पुरावा अभिलेखावर आल्याने त्यांचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३(१) ब अन्वये नोंदविले जाणारे निवेदन निशाणी ४७ वर नोंदवण्यात आले.

६) अभियोग पक्षाने विदवान सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती एस.पी.औताडे आणि आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ के.एस.ढेरे यांचा विस्तत युक्तीवाद ऐकला.

७) खटल्यामधील साक्षीपुराव्याचे अवलोकन करता, प्रस्तुत खटल्याचे न्यायानिर्णयासाठी खालील मुद्दे माझे विचारार्थ प्रस्तुत होतात त्यांचे निष्कर्ष व कारणमिमांसा खालीलप्रमाणे –

| <u>अ.क्र.</u> | <u>विचारार्थ मुद्दे</u> | <u>निष्कर्ष</u> |
|---|---|---|
| १ | दिनांक २६/११/२०१२ रोजी सकाळी १०.०० वाजण्याच्या सुमारास, मौजे खरवंडी गावात खरवंडी ते | |

| | | |
|---|---|---|
| | तामसवाडी रोडवर नदीचे पुलाजवळ, ता.नेवासा, जि.अहमदनगर येथे आरोपी क्रमांक १ व २ यांनी आपसात संगनमत करुन अडीच ब्रास वाळू शासनाच्या परवानगी शिवाय अप्रामाणिकपणे चोरुन नेली असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | नाही |
| २ | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ व २ यांनी आपसात संगनमत करुन वाळु उत्खननाचा कोणताही परवाना नसतांना वाळू उत्खनन केले आणि पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ चे कलम ३ सह कलम १५ प्रमाणे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का ? | नाही |
| ३. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ याने त्याच्या ताब्यातील डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ चे वाहन चालविण्याचा परवाना नसताना वरील ढंपर चालवून मोटार वाहन कायदा कलम ३(१) सह कलम १८१ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का? | नाही |
| ४. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपी क्र.१ याने याने ताब्यातील डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ चे मुळ कागदपत्र जवळ न बाळगता वरील डंपर चालवून मोटार वाहन कायदा कलम १३० सह कलम १७७ प्रमाणे गुन्हा केला असे अभियोग पक्षाने शाबीत केले आहे का? | नाही |
| ५. | आदेश काय ? | आरोपी नं.२ यांची निर्दोष मुक्तता करण्यात येते. |

## कारणमिमांसा

### मुद्दा क्र.१ ते ४–

८) याकामी अभियोग पक्षाने सादर केलेल्या पूराव्याचे स्वरुप पाहता पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता मुद्दा क्र.१ ते ४ वर एकत्रित विश्लेषण करणे सोयीचे होणार असल्यामुळे सदर मुद्दे विश्लेषणाकरीता एकत्रित घेतलेले आहेत.

९) साक्षीदार क्र.३ हे जप्ती पंचनामा करणारे पंच आहेत. त्यांनी अभियोग पक्षास सहकार्य केलेले नाही. त्यांच्या उलटतपासात त्यांच्यावर विश्वास ठेवावा अशी कोणतीही परिस्थिती समोर आलेली नाही.

१०) साक्षीदार क्र.१ हे फिर्यादी असून त्यांनी निशाणी ३७ लगतची फिर्याद दिल्याचे सांगितले आहे. साक्षीदार क्र.२ हे देखील पोलिस अधिकारी असुन सदर गुन्हा घडला तेव्हा पेट्रोलिंगसाठी फिर्यादीसोबत हजर होते. त्यांनी आरोपी क्र.१ हा डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ चा चालक होता. तो त्या डंपरमधुन अडीच ब्रास वाळु वाहतूक करीत असताना मिळुन आला होता. त्याच्याकडे वाहतुक व वाहन चालवण्याचा परवाना नव्हता. प्रस्तुत साक्षीदार क्र.२ यांनी देखील दिनांक २६/११/२०१२ रोजी एम एच १२ ई एफ २२६६ क्रमांकाचा डंपर पकडल्याचे सांगितले आहे. त्याचबरोबर त्यामध्ये अडीच ब्रास वाळु भरलेली होती. त्या डंपरचा चालक विष्णु किशोर टिमकरे हा होता. तो सदर वाळु वाहतुक ही विनापरवाना करित असल्याचे सदर साक्षीदार क्र.२ यांनी सांगितले आहे.

११) तपासी अंमलदार घटनास्थळ पंचनामा व जप्ती पंचनामा शाबीत झालेला नाही.

जप्त डंपर आणि वाळु आरोपी क्र.२ च्या ताब्यातून जप्त केल्याबाबतचा पुरावा अभिलेखावर नाही. परंतु प्रस्तुत गुन्हयातील वाहन आणि वाळु जप्त केल्याचा पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे सदरची वाळु आरोपी क्र.२ कडून जप्त झालेली नाही. सदर आरोपी क्र.२ हा जप्त डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ चा मालक असल्याचे सुपुर्तनाम्यावरुन दिसून येते. परंतु, सदर वाळु वाहतुक परवाना नसताना आरोपी क्र.१ ने आरोपी क्र.२ च्या सांगण्यावरुन केली असा कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर नाही. त्यामुळे सदर गुन्हयात वापरलेल्या डंपरच्या मालकीशिवाय आरोपी क्र.२ चा प्रस्तुत गुन्यामध्ये काही सहभाग असल्याचे दिसून येत नाही.

१२) प्रस्तुत प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार नाहीत त्यामुळे आरोपींकडून तात्काळ मुददेमाल प्राप्त झाला असता तर भारतीय पुरावा कायदा कलम ११४ अन्वये ते चोर आहेत असे गृहीतक काढण्यासारखी स्थिती सकृत दर्शनी निर्माण झाली असती परंतू तशी कोणतीही जप्ती अभियोग पक्षाने पुर्ण संशयापलीकडे शाबीत केलेली नाही. तसेच आरोपी क्र.२ हा सदर डंपर वादातीत घटनेच्यावेळी चालवित होता असे दिसून येत नाही. त्यामुळे डंपर क्र. एम एच १२ ई एफ २२६६ चे मुळ कागदपत्र जवळ न बाळगता व वाहन चालवण्याचा परवाना नसताना वरील डंपर चालवून मोटार वाहन कायदा कलम १३० सह कलम १७७ व १८१ प्रमाणे आरोपी क्र.२ ने गुन्हा केला असे शाबीत होत नाही. म्हणून मुद्दा क्र.१ ते ४ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.५–</u>**

१३) वरील चर्चेबरोबर अभियोग पक्षास आरोपी क्र.२ वरील वरील दोषारोप सबळ

पुराव्याआधारे शाबीत न करता आल्याचे स्पष्ट होते. सबब, मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षात मी खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## आदेश

१ आरोपी क्र.२. दिलीप शिवाजी दुसुंगे रा. कापुरवाडी, ता. जि. अहमदनगर यांची फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८(१) नुसार भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३७९ सह कलम ३४, गौण खनिज कायदा कलम ३ सह कलम १५ तसेच मोटार वाहन कायदा कलम ३(१)/१८१ व १३०/१७७ या गुन्हयातून निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२ आरोपी क्र.२ दिलेला जामीन कदबा व वैयक्तिक जातमुचलका रद्द करण्यात येतो.

३ आरोपी क्र.२ यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये अपील कालावधीसाठी व अपील दाखल झाल्यास त्यामध्ये विनाविलंब हजर राहण्याच्या हमीसाठी प्रत्येकी रक्कम रू.१५,०००/– चा नवीन वैयक्तीक जात मुचलका व जामीन कदबा तात्काळ सादर करावा.

४. सदरचा खटला आरोपी क्र.१ करिता पुढे चालवण्यात येत आहे.

(सदरचा न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला)

सही/–

दिनांक – २३/०२/२०२३.

ठिकाण – नेवासा.

**(श्रीमती ए.एस.गुंजवटे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

न्यायालय क्र.२, नेवासा.